# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ११/०६/२०२३ (रविवार)

..................................................................................

## रागाच्या भरात पतीनेच केला पत्नीचा खुन

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत यातील फिर्यादीचे वडील नामे— गणेश घोडस्वार हे कंपनीतुन काम सोडुन मागील दोन वर्षापासुन घरी बसले होते. व ते नेहमी कोणत्याही कारणाने पत्नीवर संशय घ्यायचे. व झगडा भांडण मारपीट करायचे. नेहमी मारपीट करीत असल्याने फिर्यादीची आई पागलासारखी करू लागली होती. तेव्हापासुन फिर्यादीचे वडील हे फिर्यादीचे आईची आंघोळ व जेवण घालत होते. दिनांक ०९/०६/२०२३ चे २०/०० वा दरम्यान. फिर्यादीचे वडीलांनी, मृतक हीला आंघोळ करण्यासाठी म्हटले असता मृतक हीची तब्बेत बरी नसल्याने "मी आंघोळ करीत नाही" असे म्हटले असता फिर्यादीचे वडीलांनी रागाचे भरात तिला हाताने मारहाण करू लागल्याने आई ओरडली असता, फिर्यादीने स्वता बाहेर येवुन पाहीले असता फिर्यादीचे चे वडील मृतकाचे केस पकडुन तिचे डोके बाथरूमचे भिंतीवर आपटत होते. मृतक ही बाथरूममध्ये लुस्त पडल्याने फिर्यादीने व मृतकचे पतीने हात पकडुन घरात आणले. व झोपवुन दिले. त्यानंतर ०८/०० वा दरम्यान मुलीने जेवण करायला विचारले असता, मृतक हीने मान हलवुन जेवण्यास नकार दिला. नंतर सगळे झोपी गेले. दुसरे दिवशी दि. १०/०६/२०२३ चे ०६/३० वा. दरम्यान सकाळी फिर्यादी ही मृतक जवळ गेली असता तिचे डोळे अर्धवट उघडे होते. व शरीर कडक आले होत. फिर्यादीने वडीलांना सांगितले असता, वडीलांनी "तुझी आई मरण पावली आहे", असे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कु. भुमिका गणेश घोडेस्वार वय १७ वर्ष रा सावली माउली तह कळमेश्वर जिल्हा.— नागपूर. मो नं. ९८५०७८९८६२ चे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी नामे— गणेश घोडेस्वार वय ४९ वर्ष रा सावली माउली तह कळमेश्वर यांचे विरूध्द कलम ३०२ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/हरिचंद्र गावडे ८४२४०४३१३५ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**